# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त कार्यालय

मुख्यालय, २रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८ ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in

जा.क्र. मनपा/ आयुक्त / ६१ /२०२५-२६ दि.२५/०९/२०२५

**परिपत्रक**

**विषयः-** स्थळ पाहणी नंतर इतिवृत्त तयार करुन मान्यता घेणेबाबत.

महानगरपालिकेच्या विविध विभागांतर्गत सुरु असलेली विविध विकास कामे, योजनाच्या कामांची सद्यस्थिती आढावा तसेच नागरिक, संस्था, लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त अर्ज, तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्तांकडून संबंधित ठिकाणी आवश्यकतेनुसार स्थळ पाहणी करण्यात येते.

सदर स्थळ पाहणी संबंधित विभागाचे खातेप्रमुख/विभागप्रमुख यांच्या उपस्थितीत केली जाते. स्थळ पाहणी दरम्यान निदर्शनास आलेल्या बाबींबाबत आयुक्तांकडून संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख यांना निर्देश/सूचना दिल्या जातात.

सदर निर्देश/सूचनांनुसार विभाग प्रमुख/खाते प्रमुख यांनी विहित मुदतीत कार्यवाही करणे व कार्यवाहीचा आढावा घेणे अपेक्षित आहे.

करिता आयुक्तांनी स्थळ पाहणी दरम्यान दिलेले निर्देश/सूचना याबाबतचे सविस्तर इतिवृत्तांत संबंधित विभाग प्रमुखांनी तयार करुन त्याच दिवशी आयुक्तांची मान्यता घ्यावी.

सदर आदेशाची काटेकोर अंमलबजावणी होईल याची खबरदारी घ्यावी.

**(राधाबिनोद अ. शर्मा,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

१) खाते प्रमुख/विभाग प्रमुख (सर्व)
२) स्थळ प्रत.